**<u>फिर्यादीतर्फे साक्षीदार क्रमांक १ ची साक्ष</u>**

**मी याव्दारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की,**

**<u>पुढील सरतपास फिर्यादीतर्फे विधीज्ञ श्री.ए.जी.पालव यांचे मार्फत.</u>**

०८. मला नि.क्र.४/१ कडील धनादेश दि. ०४/०३/२०२४ रोजीचा दाखविण्यात आला. सदर धनादेश हा आरोपीने मला दिला होता. त्यावर आरोपीची सही आहे. आरोपीने माझ्यासमोर सही केल्याने मी त्याची सही ओळखतो. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास **<u>नि.क्र.१९</u>** दिली आहे. मला आता नि.क्र. ४/२ कडील दि. ०७/०३/२०२४ रोजीचा सिंधुदूर्ग जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक यांचेकडील बँक रिटर्न मेमोची मुळ प्रत दाखविण्यात आली. सदर मेमो हा कॉम्प्युटर जनरेटेड आहे. त्यास **<u>नि.क्र.२०</u>** दिली आहे. आता मला नि.क्र.४/३ कडील दि.०३/१२/२०२० रोजीचे आरोपीस पाठविलेल्या पत्राची मुळ पत्र दाखविण्यात आली. त्यावर बँक मॅनेजरची सही व बँकेचे सिल आहे. तसेच आरोपीने सदर पत्र स्विकारलेबाबतची सही आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास **<u>नि.क्र.२१</u>** देण्यात येते. आता मला नि.क्र.४/४ कडील दि. ११/०७/२०२३ रोजीचे आरोपीस पाठविलेले डिमांड नोटीसची मुळ प्रत दाखविण्यात आली. त्यावर बँक मॅनेजरची सही व बँकेचा शिक्का आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. सदर नोटीस आरोपीला पोच झाली म्हणून त्यावर आरोपीची सही आहे. त्यास **<u>नि.क्र.२२</u>** दिली आहे. आता मला नि.क्र. ४/५ कडील आरोपीस दि.२२/३/२०२४ रोजी दिलेली डिमांड नोटीशीची स्थळ प्रत दाखविण्यात आली. त्यावर बँक मॅनेजरची सही व बँकेचा शिक्का व आमच्या वकीलांची सही आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास **<u>नि.क्र.२३</u>** दिली आहे. आता मला नि.क्र.४/६ कडील दि.२८/३/२०२४ रोजीची पोहोच पावतीची मुळ प्रत दाखविण्यात आली. त्यास **<u>नि.क्र.२४</u>** देण्यात येते. आता मला नि.क्र.४/७ कडील दाखल असलेली दि.१८/०३/२०२४ चे अधिकारपत्र व ठरावाची मुळ प्रत दाखविण्यात आली. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. ठराव पत्राच्या अनुषंगाने मला केस चालविण्याचे अधिकार देण्यात आलेले आहेत. त्यास **<u>नि.क्र.२५</u>** दिली आहे.

सरतपास पुर्ण.

आरोपीचे विधिज्ञांच्या तोंडी विनंतीवरुन उलट तपास पुढील तारखेपर्यंत तहकूब.

श्रवणोत्तर स्वीकृत

ठिकाण : मालवण
दिनांक : ०९/०६/२०२५

एम.के.फकीह
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, मालवण